प्रेसनोट

## पंडित जवाहरलाल नेहरु जंयती

जा.क्र. ७६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१४/११/२०१७

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १४/११/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उपअधीक्षक (गृह) एस. व्ही कुलकर्णी यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

भारताचे पहिले पंतप्रधान स्वातंत्र्य आंदोलनातील एक आघाडीचे नेतं महात्मा गांधीचे आवडते शिष्य पंडित जवाहरलाल नेहरु हे १८५७ च्या युध्द काळात नेहरु घराने अलाहबादेत येवुन तेथेच पाश्चात्य जिवन पध्द्तीत वाढले. त्यांची सांधी रहणी, सुस्पष्ट विचार होते. १९२७ साली सायमन कमिशन आले होते. कॉग्रसने त्या विरुध्द् लखणौला जी निदर्शने केली १९२९ साली लाहौरला कॉग्रेसने अधिवेशन भरले त्याचे अध्यक्ष पद जवाहरलाल यांना मिळाले. त्यांनी अधिवेशनात भारताचा संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला व मंजुर करुन घेतला.

स्वांतत्र्य मिळविण्यासाठी कमला नेहरुनी सुध्द्रा फार सहकार्य कले. पुढे १९४२ च्या ''चले जाव'' आंदोलनात ९ ऑगस्ट १९४२ ते २८ मार्च १९४५ पर्यत नेहरु आणि अनेक कार्यकर्ते यांना अहमदनगरच्या किल्यात इंग्रज सरकारने बंद करुन ठेवले होते. तेथे नेहरुंनी '' डिस्कव्हरी ऑफ इंडिया'' हा भारताच्या इतिसावरील मोठा ग्रंथ लिहीला.

१५ ऑगस्ट १९४७ भारताचे दोन तुकडे झाले व दोन राष्ट्रे जन्माला आली. भारत स्वतंत्र झाला. जवाहरनगर नेहरु स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले व त्याच्या हस्ते दिल्लीला लाल किल्यावर अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडविण्यात आला. पंडितजींनी भारतीय जनतेला संदेश दिला. देशाच्या भल्या साठी सर्वानी उपार कष्ट केले पाहिजे. आराम हराम आहे. त्यांनी १६ वर्ष, पंतप्रधान पदाची जवाबदारी सांभाळली होती. ते आजारी पडले आणि २७ मे १९६४ रोजी मृत्यु पावले. त्यांच्या मृत्युने सारा भारत हळहळला अश्या या पुरुषाची जंयती साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. सिडाम, जिवीशा भंडारा, पोनी. घुसर स्थागुशा भंडारा, पोनी गाडे वानीशा भंडारा, सपोनी. कदम मानवी संसाधन भंडारा, पोनी. खंडारे वायरलेस विभाग भंडारा, सपोनी. खंडाते वाचक शाखा भंडारा, पोउपनी. तुळजेवार, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस पोउपनी, प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(एस. व्हीं. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता